# न सुटणारे हे कोडे




नरेंद्र प्रभू  लिखित ग्रंथाली प्रकाशनाचं नवं पुस्तक
‘हे प्रवासी गीत माझे.... आत्माराम परब यांचा रंजक प्रवास’
या पुस्तकात असलेली चारोळी ज्या कवितेमधून घेतली ती माझी कविता

वाटा असती कधी न सोप्या
अवचित कधी ती वाट अडे
कडेकपारी सह्याद्रीच्या
घालून देती हेच धडे

कधी उन्ह तर कधी सावली
वाटेवरती पाय पडे
कसे किती अन कुठे चाललो
काय असे हे याच पुढे

कुणी कुणाचा असे सोबती
कशी कुणाशी गाठ पडे
आयुष्याच्या वाटेवरती
न सुटणारे हे कोडे

**नरेंद्र प्रभू**

http://prabhunarendra.blogspot.com/

http://shabdshabd.blogspot.com/